आर्टिस्ट कॉर्नर

# स्टँडअप चैताली !

श्रद्धा चमके
shraddha.chamke@timesgroup.com

**चैताली माजगांवकर-भंडारी हिनं तरुण वयातच 'हास्यसम्राट' म्हणून नावलौकिक मिळवलाय. जादूगार काका आणि नकलाकार वडील यांची कला पाहात पाहातच चैतालीनं एकपात्री तसंच द्विपात्री कार्यक्रम करण्याची वेगळी वाट निवडली आहे.**

**'स्टँड अप कॉमेडियन'सारखं क्षेत्र करिअरसाठी कसं काय निवडलंस?**

आमच्या घराचं आणि रंगमंचाचं पिढीजात नातं आहे. माझे वडील नकलाकार आणि काका जादूगार त्यामुळे त्यांचे परफॉर्मन्स पाहातच मी मोठी झाले. अर्थात, स्टँड अप कॉमेडियन व्हायचं, असा काही निर्णय घेतला नव्हता. माझा कल सिनेमा आणि नाटकांकडेच जास्त कल होता. मी ललित कला केंद्रातून नाट्यशास्त्राची पदवीही मिळवली. एक दिवस लक्षात आलं, की आपण स्वतःचे कार्यक्रम केले तर ते जास्त चांगलं होईल; कारण मी हजरजबाबी आणि विनोद निर्मिती करणारी आहे.

हे अगदी वेगळं क्षेत्र आहे...

आजकाल बहुधा सर्वांचाच कल नाटक, सिनेमाकडेच असतो. आज मला जाणवतं आहे, की सिनेमापेक्षा नाटकात काम करणं जसं अधिक समाधानकारक असते; अगदी त्याचप्रमाणे मला देखील माझ्या कार्यक्रमांमधून प्रेक्षकांचा प्रतिसाद ताबडतोब मिळतो. आपल्या कलेची पावती मिळत असल्यानं त्याचा आनंद काही औरच असतो.

● **कार्यक्रम रंगतदार होण्यासाठी तू काय प्रयत्न करतेस?**

'गंमतजंमत' हा माझा एकपात्री आणि द्विपात्री कार्यक्रम रंगतदार होण्यासाठी समोरचा प्रेक्षक पाहून मला सादरीकरण करावं लागतं. बायकांना सासू-सुनांचे विनोद आवडतात, मग मला त्याप्रमाणे विनोद सांगावे लागतात. प्रेक्षकांना शेवटपर्यंत हसवत ठेवण्यासाठी मी वेगवेगळे गेम शोदेखील ठेवते. गेली पंधरा वर्षं मी या क्षेत्रात आहे. त्यामुळे प्रेक्षकांचा मूड कसा सांभाळायचा, याचं तंत्र चांगलंच अवगत झालं आहे.

● **लग्नानंतरही हे सगळं कसं मॅनेज केलंस?**

मुळातच जिद्द असेल आणि कामावर प्रेम असेल, तर सारे प्रश्न संपतात. मला पती आणि सासूबाईंचा पूर्ण पाठिंबा आहे. त्यामुळेच आज मी माझी जुळी मुलं सांभाळूनही शो करू शकते.

या क्षेत्रात महिलांचं प्रमाण तसं कमीच आहे...

हो, मला सर्व महिलांना सांगायचं आहे, की नाटक आणि सिनेमा हेच काही करिअरचे मार्ग नाहीत. या क्षेत्रातही महिलांना भरपूर वाव आहे. इथं स्पर्धाही कमी आहे. आपण आपलेच गुण आधी ओळखून त्यानुसार करिअरचा मार्ग आखायला हवा.

तू हास्यसम्राट मालिकेतही भाग घेतला होतास...

हो, त्यामुळेच माझी कला घराघरात पोहोचली. मी हास्यसम्राट या मालिकेच्या सेमीफायनलपर्यंत पोहोचले होते. त्या फेरीला मकरंद अनासपुरे आले होते. त्यानंही माझं कौतुक केलं होतं.

● **आठवणीत राहणारा एखादा प्रसंग सांगशील?**

मी अनेक ठिकाणी शोज केलेले आहेत. विशेष लक्षात राहाणारा प्रसंग आहे मातोश्री वृद्धाश्रमातला. त्या आजी-आजोबांचे वय पाहून मी त्यानुसार विनोद सांगितले, नकला करून दाखवल्या. ते खूप हसत होते; पण अचानकच रडायला लागले. अनेक दिवसानंतर मनमोकळं हसल्यामुळे त्यांना रडायला आलं होतं. तो प्रसंग मन हेलावून टाकणारा होता. आपण दुसऱ्याच्या आयुष्यात काही क्षण का होईना, आनंदनिर्मिती करू शकतो याचं, मला नेहमीच खूप समाधान वाटतं.



चैताली माजगांवकर- भंडारी